
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ६६
www.ramprahar.com

# राम प्रहर

सोमवार, २३ सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## भारत–अमेरिका अत्याधुनिक ड्रोन करारावर स्वाक्षरी



**न्यूयॉर्क** : भारत आणि अमेरिका यांच्यातील संरक्षण व्यापारात सातत्याने वाढ होत आहे. दरम्यान, आता भारत हा अमेरिकेकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज ३१ एमक्यू–९बी (१६ स्काय गार्डियन आणि १५ सी गार्डियन) रिमोटली पायलटेड एअरक्राफ्ट ड्रोन/किलर ड्रोन खरेदी करणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी या करारावर स्वाक्षरी केली. मिळालेल्या माहितीनुसार भारतीय संरक्षण मंत्रालयाने गेल्या वर्षी जूनमध्ये अमेरिकेकडून हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांनी सुसज्ज एमक्यू ९बी स्काय गार्डियन आणि सी गार्डियन सशस्त्र ड्रोन आणि लेझर–गाइडेड बॉम्ब खरेदी करण्यास मंजुरी दिली होती. आताच्या रोडमॅप अंतर्गत जेट इंजिन, दारूगोळा, ग्राउंड मोबिलिटी सिस्टीम यांसारखी अवजड उपकरणे व शस्त्रे तयार केली जाणार आहेत.

**अंतरंग**

माणगाव बसस्थानकातील रस्त्याचे भूमिपूजन/२

पुरस्काराने आणखी कामासाठी बळ -आमदार प्रशांत ठाकूर/५

माथेरान घाटात नवीन मिनीबस धावणार/७

# प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी घरांचा अध्यादेश काही दिवसांत काढणार

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा



**नवी मुंबई : बातमीदार**

सिडको प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपोटी घरांचा प्रश्न मार्गी लागणार आहे. त्याच्या अध्यादेशावर माझी सही झाली असून काही दिवसांत अध्यादेश जारी होईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. २२) केली. ते ऐरोली येथे साकारण्यात येत असलेल्या कोळी भवनाच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते.

व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेतील भाजपचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर, खासदार नरेश म्हस्के, आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, कोळी महसंघांचे अध्यक्ष आमदार रमेश पाटील, आमदार निरंजन डावखरे, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे, माजी आमदार संदीप नाईक, कोळी महासंघाचे नेते अ‍ॅड. चेतन पाटील, शिवसेना नेते विजय चौगुले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, प्रकल्पग्रस्तांच्या घरांची आजूबाजूची जागासुद्धा नियमित होईल. जे शुल्क घेणार आहोत तेदेखील आम्ही कमी केले आहे. बेस रेटच्या कमी पैसे कमी घेणार आहोत. मालकी हक्काने घरे देण्याचा निर्णय घेतला आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, एक दिवस रमेश पाटील माझ्याकडे आले व म्हणाले आदेश होत नाही. मी सिडको एमडींना फोन करून सांगितले ज्यांच्या जमिनींवर हे सिडको मंडळ तयार झाले त्यांना तातडीने भूखंड द्या. आम्ही राज्यात रमेश पाटील यांच्या सांगण्यावरून नुकसानभरपाई देण्याची पॉलिसी आणली. वरळी सेतू बांधताना कोळी बांधवांच्या विनंतीवरून स्पॅम वाढवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी तातडीने निर्णय घेत कोळी बांधवांना दिलासा दिला. पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी इतिहासात पहिल्यांदा कोळी समाजाचा विचार केला. वेगळे खाते तयार झाले. मत्स्यसंपदा योजना आणली. वाढवण बंदरातील प्रकल्पग्रस्तांना देशातील सर्वात मोठे पॅकेज दिले जाणार आहे.

आमदार गणेश नाईक यांनी रमेश पाटील यांचे कौतुक करताना नवी मुंबईतील ते पहिले उद्योगपती असून त्यांनी समाजासाठी वाहून घेतले असल्याचे म्हटले.

आमदार रमेश पाटील यांनी अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र तातडीने मिळावे तसेच प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्यांचे उरलेले भूखंड मिळावेत, अशी मागणी केली. यासह वाढवण बंदरातील मच्छीमारांचे संभ्रम दूर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मुंबईतील ४२ कोळीवाड्यांचे सीमांकन झाले सांगून त्यांचे कौतुक केले. कोळी भवनासाठीही त्यांच्यामुळे भूखंड मिळाल्याचे ते म्हणाले.

आमदार मंदा म्हात्रे यांनी बेलापूर मतदारसंघात दोन हजार कोटी निधी आणू शकले, स्मार्ट व्हिलेज करू शकले, प्रकल्पग्रस्त मच्छीमारांना नुकसानभरपाई देऊ शकले, असे सांगून मी तुमची लाडकी बहीण आहे. आशीर्वाद रहावा, असे म्हटले. त्यावर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री दोघांनी हसून प्रतिसाद दिला. मुख्यमंत्री म्हणाले की, आम्ही दोन भाऊ तुमच्यासोबत आहोत. तुम्ही काळजी करू नका. कार्यक्रमास कोळी बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबियांचा ‘रयत’कडून गौरव

## विद्यमान शैक्षणिक वर्षात सात कोटी ११ लाख रुपयांची देणगी




**सातारा : हरेश साठे**

समाजकारणाला महत्त्व देत सामाजिक दायित्व बजावणारे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, माजी खासदार थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी विद्यमान शैक्षणिक वर्षात रयत शिक्षण संस्थेला सात कोटी ११ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते रविवारी (दि. २२) कर्मवीर जयंतीनिमित्त समारंभपूर्वक हृद्य गौरव करण्यात आला.

बहुजनांच्या शिक्षणाचे वटवृक्ष रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७वा जयंती सोहळा सातारा येथे कर्मवीर भूमीत अनेक मान्यवर व हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत झाला.

थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला आहे. आजपर्यंत १०० कोटींहून अधिक रुपयांची देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे अखंड कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर करीत आहेत. त्यांनी विधायक कामाला प्रोत्साहन देण्यासाठी नेहमी मुक्तहस्ते मदत केली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या विद्यालयांना उभारी देण्याचे काम केले.

विद्यमान शैक्षणिक वर्षात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दोन कोटी ६५ लाख रुपये, त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनी तीन कोटी ९१ लाख रुपये, तर सुपुत्र परेश ठाकूर यांनी ५५ लाख रुपयांची देणगी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. त्याबद्दल त्यांचा या वेळी संस्थेच्या वतीने सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले तसेच सात्रल विद्यालयाच्या विकासासाठी ५० लाख रुपयांची देणगी दिल्याबद्दल या शाखेच्या वतीनेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला.

चांगले विचार स्वतः आणि इतरांना घडविण्याचे काम करते. जन्माला येताना आणि मृत्यूनंतर खाली हात जावे लागते. माणुसकी आणि विचार अमर असतात. शैक्षणिकदृष्ट्या समाजाच्या विकासासाठी सर्वांनी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेणे गरजेचे आहे आणि याच सामाजिक भावनेतून लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीय कार्य करीत असतात. रयत शिक्षण संस्था आणि ठाकूर कुटुंबियांचे जिव्हाळ्याचे नाते आहे. तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचावे यासाठी कर्मवीर अण्णांनी केलेले कार्य पुढे नेण्याचे काम रयतसेवक म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर सतत करीत आहेत. स्वतःची जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था ही शैक्षणिक संस्था असतानाही त्यांचे रयत शिक्षण संस्थेवर असलेले जीवापाड प्रेम कायम अधोरेखित झाले आहे. रयत शिक्षण संस्थेला मातृसंस्था मानून सदैव रयतेच्या विकासासाठी कार्य करणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपूर्ण देशात आदर्श घालून दिला आहे. संस्थेच्या प्रत्येक उपक्रमात त्यांनी स्वतःला झोकून दिले. त्यामुळे संस्थेचे आधारस्तंभ असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबाचा सन्मान करून त्यांच्याप्रती आभार व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, व्हाइस चेअरमन भगीरथ शिंदे, सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, **(पान २ वर..)**

## निवडक

### कामाच्या अतिताणाचा आणखी एक बळी; इंजिनिअरची आत्महत्या

**चेन्नई** : पुण्यात एका २६ वर्षीय तरुणीचा कामाच्या अतिताणाने मृत्यू झाल्याचा दावा तिच्या आईने केला आहे. त्यानंतर आता चेन्नईमध्ये एका तणावग्रस्त तरुणाने स्वतःला शॉक देऊन आत्महत्या केल्याचे वृत्त आहे. कार्तिकेयन असे त्याचे नाव असून तो एका सॉफ्टवेअर कंपनीत तंत्रज्ञ म्हणून काम करत होता. नैराश्येत गेल्याने त्याच्यावर उपचारही सुरू होते, असे पोलिसांनी सांगितले.

### युपीमध्ये रेल्वे रूळावर पुन्हा आढळले गॅस सिलिंडर

**कानपूर** : काही दिवसांपूर्वी कानपूरमधील शिवराजपुरा भागात रेल्वे रूळावर गॅस सिलिंडर ठेवून कालिंदी एक्स्प्रेस खाली उतरवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्या वेळी चालकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. पुन्हा एकदा प्रेमपूर रेल्वेस्थानकापासून काही मीटर अंतरावर रेल्वे रूळावर गॅस सिलिंडर आढळून आले आहेत. गेल्या एका महिन्याभरातली ही पाचवी घटना आहे. त्यामुळे रेल्वेचे अपघात घडवून आणण्यासाठी कट रचला जातो आहे का, अशी चर्चा आहे.

# कृत्रिम हातपाय बसविण्याचे शिबिर यशस्वी

## ■ आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिति





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल, साधू वासवानी मिशन पुणे, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन, फिनोलेक्स केबल्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने जयपूर फूट बसविण्याचे शिबिर मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २२) झाले.

मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूटसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ऑगस्ट महिन्यात शिबिर झाले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून त्या अनुषंगाने कृत्रिम हात, पायासाठी मापे घेतली गेली होती. अशा व्यक्तींना हे कृत्रिम अवयव रविवारी पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात बसविण्यात आले.

या शिबिरास श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, भाजप सांस्कृतिक सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, जयपूर फूट प्रोजेक्ट हेड मिलिंद जाधव, साधू वासवानी मिशनचे प्रतिनिधी डॉ. सलील जैन, सुशील ढगे, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि साधू वासवानी मिशन कॉर्डिनेटर डॉ. सचिन जाधव, मंडळाचे कार्यालयीन सचिव अनिल कोळी यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्याम पुंडे यांनी केले.

# मराठा समाजाचे शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले

## आरक्षण व इतर मागण्यांवर चर्चा

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे मागील सहा दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. या पार्श्वभूमीवर सकल मराठा समाजाचे शिष्टमंडळ रविवारी (दि. २२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटले. या भेटीत मराठा आरक्षण आणि इतर मागण्यांविषयी मुख्यमंत्र्यांशी शिष्टमंडळाने चर्चा केली.

या संदर्भात माहिती देताना मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले की, मराठा समाजाच्या सात जणांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेत त्यांच्या मुख्य मागण्यांविषयी चर्चा केली. जरांगेंच्या मागण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सूचना केली आहे. उद्या कॅबिनेटची बैठक झाल्यानंतर माझी आणि चंद्रकांतदादा पाटील यांची या संदर्भात बैठक होणार आहे. जरांगेंनी उपोषण स्थगित करावे, अशी विनंती माझ्यातर्फे तुम्ही जरांगेंना करावी, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. ते उपोषण स्थगित करतील, असा मला विश्वास आहे.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके हेही उपोषणाला बसले आहेत. त्याविषयी बोलताना मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, कुणाच्याही आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही हे मुख्यमंत्र्यांनी आधीच सांगितले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही मागणी होती. त्याप्रमाणे १० टक्के आरक्षण मराठा समाजाला देण्यात आले आहे व ते कोर्टातही टिकेल.

# पहिल्या कसोटीत भारताची बांगलादेशवर मात

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने पहिल्या कसोटीत बांगलादेशचा २८० धावांनी पराभव केला आहे. यासह भारताने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १–०ने आघाडी मिळवली आहे. भारताने बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचे आव्हान दिले होते, मात्र पाहुणे दुसऱ्या डावात २३४ धावांवर गारद झाले. रविचंद्रन अश्विनच्या सहा विकेट्स घेतल्या. त्याला अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

पाचशेपार धावांच्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना तिसऱ्या दिवसअखेर बांगलादेशने ४ बाद १५८ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवसाच्या सुरुवातीला



शाकिब अल हसन आणि कर्णधार नजमुल शांतो यांनी डाव सावरला, पण अश्विन पुन्हा एकदा त्यांच्यासाठी काळ ठरला. त्याने शाकिबला बाद करताच रवींद्र जडेजाने लिटन दास आणि पुढच्या फलंदाजांना बाहेरचा रस्ता दाखवला. या डावात अश्विनने सर्वाधिक सहा बळी घेतले, तर जडेजाने तीन आणि बुमराहने एक गडी बाद केला.

### ऐतिहासिक विजय

भारतीय क्रिकेट संघाने १९३२ साली कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले तेव्हापासून एकूण ५८० सामने खेळले आहेत. ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच भारताने पराभवापेक्षा जास्त विजयाचा आकडा गाठला आहे. बांगलादेशचा पराभव करून टीम इंडियाने कसोटी क्रिकेटमधील १७९वा विजय संपादन केला आहे, तर संघाला १७८ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. भारताने खेळलेले २२२ सामने अनिर्णित राहिले, तर एक सामना रद्द झाला आहे.

**अश्विनचा पराक्रम** : घरच्या मैदानावर म्हणजेच चेन्नईच्या एमएम चिदंबरम स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाच्या विजयात फिरकीपटू रविचंद्रन अश्विनचे महत्त्वाचे योगदान होते. अश्विन आता पहिला खेळाडू बनला आहे, ज्याने एकाच मैदानावर शतक झळकावण्याबरोबरच त्याच सामन्यात पाच विकेट्सही घेतले आहेत. अश्विनने हा पराक्रम चेन्नईत दोनदा केला, तर कसोटी क्रिकेटच्या इतिहासात चौथ्यांदा या भारतीय स्टार फिरकीपटूने एकाच कसोटीत केवळ शतकच केले नाही, तर पाच विकेट्सही घेतल्या आहेत. इंग्लंडच्या इयान बोथमने पाच वेळा हा पराक्रम केला आहे.

# खंबाटकी घाटात कंटेनर आठ वाहनांना धडकला; पाच जण जखमी

**सातारा : प्रतिनिधी**

पुणे–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर खंबाटकी बोगदा ओलांडल्यानंतर असलेल्या ‘एस’ वळणावर रविवारी (दि. २२) भरधाव कंटेनरने पुढील आठ गाड्यांना जोरदार धडक दिली. त्यामुळे झालेल्या विचित्र अपघातात सात कार व एका रिक्षाचा चुराडा झाला, तर पाच जण जखमी झाले.

खंबाटकी बोगदा ओलांडल्यानंतर असलेल्या तीव्र उतारावरून रविवारी ‘एस’ वळणावरून जाताना कंटेनर चालकाचा ताबा सुटला. यामुळे कंटेनरने पुढे चाललेल्या वाहनांला धडक दिली. परिणामी ही वाहने एकमेकांना धडकली. रविवारची सुटी असल्यामुळे महामार्गावर वाहनांची मोठी गर्दी होती. अपघाताची माहिती मिळताच खंडाळा पोलीस तातडीने घटनास्थळी धावून गेले. वाहनांना मार्ग काढताना अडचण येत होती. बोगद्यापर्यंत वाहनांची मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे पोलिसांना वाहतूक सुरळीत करण्यासाठी कसरत करावी लागली.

# चेस ऑलिम्पियाडमध्ये भारताला ऐतिहासिक ‘सुवर्ण’

**बुडापेस्ट : वृत्तसंस्था**

भारताचा बुद्धिबळपटू डी गुकेशने बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये इतिहास घडवला आहे. अंतिम सामन्यात त्याने शानदार खेळ केला आणि भारतासाठी सुवर्णपदक जिंकले.

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये खुल्या विभागात भारताने ऐतिहासिक पहिल्या सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले आहे. भारतीय संघात गुकेश डी, आर प्रज्ञानंद, अर्जुन इरिगसी, विदित गुजराथी, पेंटाला हरिकृष्ण आणि श्रीनाथ नारायणन यांचा समावेश आहे. अर्जुन इरिगसी आणि डी गुकेश यांनी आपापल्या सामन्यांमध्ये विजय मिळवल्यानंतर आणि दुसऱ्या स्थानावर असलेल्या चीनला यूएसएविरुद्ध दोन गुणांचा फटका बसल्यानंतर भारताचे ऐतिहासिक सुवर्णपदक निश्चित झाले.



# मुख्यमंत्री शिंदेंनी मांडला रस्ते विकासाचा नवा आराखडा

**ठाणे : प्रतिनिधी**

विकासाच्या कामांमध्ये आपण स्पीडब्रेकर टाकणारे नसून स्पीडब्रेकर काढून विकासाला चालना देणारे आपले सरकार आहे. राज्यभरात जवळपास पाच हजार किमीचे रोड तयार होत असल्याने आगामी काळात राज्यातील कुठल्याही ठिकाणी केवळ सहा-सात तासांमध्ये माणूस पोहचेल, अशा प्रकारची कामे सुरू असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

नीती आयोगाच्या अहवालानुसार, एमएमआर जागतिक आर्थिक केंद्र बनविण्याच्या दृष्टीने एमएमआर क्षेत्रांमध्ये सर्वांसाठी घरे, माहिती व तंत्रज्ञान, उद्योग ४.०, पर्यावरण, आणि रोजगार निर्मिती या प्रमुख पाच क्षेत्रांना केंद्रबिंदू



मानून ठाणे जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आणि मित्रा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२२) डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह येथे ठाणे विकास परिषद-२०२४ भरविण्यात आली. या परिषेदेचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले, त्या वेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्याची इकॉनॉमी २०३०पर्यंत ४८ बिलियनवरून दीड ट्रिलियन बनविण्याच्या नियोजनबद्ध आराखड्याचे कौतुक करीत त्यासाठी लक्ष केंद्रित करून काम करण्याच्या सूचना सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

ते पुढे म्हणाले, ठाण्याला काही गोष्टी सुरू होतात मग त्या सगळीकडे सुरू होतात. पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये देखील महाराष्ट्र नंबर १ असून आता पर्यावरणाचा विषय घेतला आहे. अटल सेतूनंतर खाडीतील फ्लेमिंगो दुप्पट वाढल्याचा एनजीओचा अहवाल आहे. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी ठाण्यामध्येदेखील ईस्टर्न फ्री वेचा विस्तार हा मुंबईतील खेडा नगर सर्कल ते साकेत व्हाया आनंद नगर ते आपण थेट बाळकुमवरून घोडबंदर रोडवरील फाउंटन हॉटेलला जोडला जाईल. त्यामुळे वाहने बाहेरचे बाहेर म्हणजे सिग्नलमुक्त प्रवास करीत ४० मिनिटांमध्ये मुंबई ते घोडबंदर रोडद्वारे अहमदाबादला निघून जातील. ठाणे-बोरीवली भुयारी मार्गामुळे २० मिनिटांत प्रवास होणार आहे. इतर राज्यापेक्षा उद्योगांना चांगल्या सुविधा देऊन इंडस्ट्री वाढविली पाहिजे, तरच रोजगार वाढेल. पायाभूत सुविधा आणि त्याबरोबर पर्यावरण, पर्यटनावर भर दिला जात आहे.

ठाण्यात क्लस्टर डेव्हलपमेंटमध्ये पाच इमारतींचे काम सुरू झाले असून मुंबईतील रखडलेल्या एसआरएच्या योजना एमएमआरडीए, सिडको महापालिका हाती घेऊन पुन्हा सुरू करणार आहे. १७००० घरांचा प्रकल्प आपण सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

# माणगाव बसस्थानकातील रस्त्याचे भूमिपूजन

## मंत्री आदिती तटकरे, आमदार भरत गोगावले यांची उपस्थिती

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील बसस्थानकात आमदार भरत गोगावले व महिला बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी एक कोटी दोन लाख ८४ हजारांच्या कामाचे भूमिपूजन केले.

या वेळी महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी, माणगाव बसस्थानक हे बारामती बसस्थानकासारखेच सुसज्ज व आधुनिक करण्यात येईल. यासाठी यापूर्वीच नऊ कोटी ६२ लाखांचा आराखडा सादर करण्यात आला आहे. या बसस्थानकाच्या बांधकामासाठी सुमारे चार कोटी आणि आगारासाठी सहा कोटी इतका निधी खर्च करण्यात येणार असल्याचे सांगितले.



शिवसेना पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांनी, संपूर्ण कोकणाला भेडसावणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाचे काम येत्या आठ ते १० महिन्यात पूर्ण करण्याची जबाबदारी आमची असून आणि ते पूर्ण करणारच. माणगाव बसस्थानक आणि आगारातील ज्या काही समस्या असतील त्या तातडीने सोडविण्यात येतील. येथे आरटीओ कार्यालय सुरू व्हावे यासाठी रिक्षा संघटना अध्यक्ष संजय साबळे यांनी दहा वर्षांपासून पाठपुरावा केला होता. त्यांची ही मागणी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. माणगावजवळील मुगवली येथे प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि ट्रॅक व मूलभूत सुविधा सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात येईल. माणगाव आणि इंदापूर महामार्गावरील या बायपास मार्गाची निविदा निघाली असून लवकरच ते काम सुरू करण्यात येणार आहे, असे सांगितले.

या कार्यक्रमाला शिसवेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, राष्ट्रवादी जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, जिल्हा महिला संघटिका निलिमा घोसाळकर, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, भाजप युवमोर्चा अध्यक्ष निलेश थोरे, राष्ट्रवादी कोकण प्रवक्ता सायली जाधव, ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष काका नवगणे, निजामपूर सरपंच राजा रणपिसे, भाजप तालुकाध्यक्ष गोविंद कासार, राष्ट्रवादी महिलाध्यक्ष संगीता बक्कम, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, शिसवेना शहरप्रमुख सुनील पवार, नगरसेवक सचिन बोंबले, शर्मिला सुर्वे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, एसटी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# रसायनीतील गुळसुंदेत बिबट्याचा वावर; नागरिकांना सतर्कतेचा इशारा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुळसुंदे येथील अंकुश साठे यांच्या घराबाहेर बिबट्या दिसल्याने परिसरात खळबळ माजली आहे.

गुळसुंदे येथे राहणारे अंकुश साठे यांना काही दिवसांपूर्वी पहाटे ३.३०वा. घराच्या बाहेर बिबट्या दिसल्याने आरडाओरड केली. त्यामुळे बिबट्या पळून गेला. दुसऱ्या दिवशी साठे यांनी बिबट्या दिसल्याची घटना काही ग्रामस्थांना सांगितली. त्यांच्या निवासस्थानाबाहेर



असलेल्या सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात बिबट्या दिसत आहे.

ही घटना प्राणीमित्र मनोहर कुलकर्णी आणि प्रथमेश मोकल यांना समजली असता त्यांनी आपटा वनअधिकारी व गुळसुंदे ग्रामपंचायतीला माहिती दिली तसेच बिबट्या दिसल्याने गावातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्याचे ग्रामपंचायतीला सांगितले. वनअधिकारी यांनी सीसीटीव्ही फुटेज व बिबट्या जिथे आला होता तेथील जमिनीवर पाहणी केली असता बिबट्या आल्याचे दिसून आले.

बिबट्या वयाने लहान असल्याने त्याने पाळीव प्राण्यांवर हल्ला केला नसल्याचा अंदाज प्राणीमित्र कुळकर्णी व मोकल यांनी व्यक्त केला आहे.

# कामोठ्यात गाडीच्या चाकांची चोरी

**कळंबोली : बातमीदार**

कामोठ्यात रस्त्यावर उभ्या करण्यात आलेल्या व्हॅगनार गाडीच्या मागील टायरसह दोन चाक चोरट्याने काढून नेल्याची घटना शनिवारी (दि.२१) रात्री घडली.

याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून सीसीटीव्हीच्या माध्यमातून चोरट्यांचा तपास सुरू आहे. कामोठे येथील सेक्टर १९मध्ये प्रेसिडेन्सी हाऊसिंग सोसायटीमधील विनायक शिराळकर यांची (एमएच ०२ सीबी १६३३) व्हॅगनार गाडी त्यांनी शनिवारी रात्री सोसायटीच्या जवळील



रस्त्यावर उभी करून ठेवली होती, मात्र चोरट्यांनी या गाडीचे लॉक तोडून गाडीतल्या जॅक काढून त्याने दोन टायर घेऊन चोरट्यांनी पोबारा केला. सकाळी निघत असताना गाडीमध्ये गाडीची चाके चोरीस गेल्याचे शिराळकर यांच्या निदर्शनास आले. त्यांनी याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यास केल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली.

# पनवेलमध्ये स्वच्छता वॉर्ड संवाद बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता या संकल्पनेसह स्वच्छता ही सेवा मोहिमेंतर्गत आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी (दि.२१) खारघर व कळंबोली प्रभागामध्ये विविध ठिकाणी स्वच्छता वॉर्ड संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले.



स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेच्या प्रयत्नांमध्ये सामूहिक कृती आणि नागरिकांची शहर स्वच्छतेतील सहभागाची भावना प्रज्वलित करण्यासाठी स्वच्छता ही सेवा मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे. या मोहिमेंतर्गत खारघर व कळंबोलीमध्ये विविध ठिकाणी स्वच्छता वॉर्ड संवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत त्या भागातील ज्येष्ठ नागरिक संघ आणि परिसरातील नागरिकांनी सहभाग नोंदविला. या वेळी स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यात आले तसेच कचऱ्याचे वर्गीकरण व समस्या यावरती चर्चा करण्यात आली.

या पद्धतीने सोमवारी (दि.२३) कामोठे व पनवेल प्रभागामध्ये विविध ठिकाणी स्वच्छता वॉर्ड संवाद बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या वेळी प्रभाग समिती ब चे आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, त्या त्या विभागाचे स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता पर्यवेक्षक उपस्थित होते.



**पनवेल : कांता आत्माराम लव्हाट यांच्या घरी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी गौरा गणपतीचे दर्शन घेतले.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.२१)प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टीचे आयोजन केले होते.




महाविद्यालयातील सर्व शाखेतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या वेळी वेगवेगळी नृत्ये, गीते तसेच वेगवेगळे गेम्स सादर करुन त्यांच्या कलागुणांचे सादरीकरण केले. माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्रथम वर्षाचा रेहान मिरडे याला मिस्टर फ्रेशर्स तसेच वाणिज्य शाखेतील प्रथम वर्षाची सानिया शेख हिला मिस फ्रेशर्स म्हणून निवडले. प्रा. डॉ. रीत ठुले व प्रा. राहुल कांबळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या फ्रेशर्स पार्टीचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच सर्व प्राध्यापक या सर्वांचे अभिनंदन केले.

या फ्रेशर्स पार्टीचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा व प्रा. रेवण शिंदे यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. नीलम मोरे, प्रा. दिपाली लावंड, प्रा. शुभम शर्मा, प्रा. प्रमोद वाघे दोन्ही समितीतील इतर सर्व सदस्य तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर आणि कुटुंबियांचा 'रयत'कडून गौरव

संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू-पाटील, सचिव विकास देशमुख, आमदार बाळसाहेब पाटील, आमदार शशिकांत शिंदे, आमदार सुमन पाटील, जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, वैशाली देशमुख, जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, शुभांगी घरत, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू ज्ञानदेव म्हस्के यांच्यासह मॅनेजिंग कौन्सिल व जनरल बॉडी सदस्य, रयतसेवक उपस्थित होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी रयतसेवकांना मार्गदर्शन केले तसेच संस्थेच्या कार्याचा आणि पुढील वाटचालीचा आढावा मांडला.



लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या पनवेल तालुक्यातील गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयाने यंदाचे कर्मवीर पारितोषिक पटकावले असून त्यांचाही या वेळी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.




# बँक ऑफ इंडियात हिंदी मास समापन कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ इंडिया नवी मुंबई आंचलिक कार्यालयात हिंदी महिना साजरा करण्यात आला. यादरम्यान कार्यालयात स्टाफने दैनंदिन कामकाजामध्ये हिंदी भाषेचा वापर केला.

विभागीय अध्यक्ष अतुल सातपुते व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत गृहमंत्री अमित शाह तथा बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रजनीश कर्नाटक यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले. या वेळी कार्यालयीन कामकाजात जास्तीत जास्त हिंदी भाषेचा वापर करण्याची प्रतिज्ञा विभागीय अध्यक्ष अतुल सातपुते व सर्व कर्मचाऱ्यांनी घेतली. अतुल सातपुते यांनी, आपल्या कार्यालयात जास्तीत जास्त काम हिंदीत करावे. हिंदी भाषा ही संपूर्ण भारताला जोडण्याची भाषा आहे. हिंदी भाषेचा वापर करून सर्वांनी राष्ट्र निर्माणामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन करून हिंदी स्पर्धेच्या विजेत्यांना





शुभेच्छा दिल्या.

हिंदी महिन्यामध्ये निबंध, बँकिंग शब्दावली, बँकिंग ज्ञान, हिंदी सुलेखन, टंकन आणि कार्यालयीन कार्यामध्ये हिंदी भाषेचा वापर स्पर्धा घेण्यात आल्या. विभागीय अध्यक्ष अतुल सातपुते आणि उपविभागीय अध्यक्ष महेश कानविंदे यांनी विजेत्यांना पुरस्कार आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

अतुल सातपुते यांनी स्पर्धेच्या विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार गच्छी मुख्य प्रबंधक (राजभाषा) रमेश साखरे यांनी केले. त्यानंतर हिंदी महिन्याची सांगता करण्यात आली.

## दुखवटा

### भुरमल सोनी


**खोपोली :** येथील बाजारपेठेतील सोन्या-चांदीचे व्यापारी भरत सोनी यांचे वडील व चामुंडा



ज्वेलर्सचे मालक भुरमल सोनी यांचे ९८व्या वर्षी वृद्धत्वामुळे निधन झाले. अंतयात्रेसमयी मोठ्या संख्येने बाजारपेठेतील व्यापारी व नागरिक उपस्थित होते. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सोमवारी (दि.२३) चंद्रविलास हॉल येथे शोकसभचे आयोजन करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात चार विवाहित मुले, पाच विवाहित कन्या व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### हरिभाऊ भोसले

**कर्जत** : तालुक्यातील भिवपुरी गावामध्ये राहणारे हरिभाऊ शिवराम भोसले यांचे ९१व्या वर्षी वार्धक्याने निधन



झाले. आठ महिन्यांपूर्वीच त्यांच्या पत्नी हिराबाई यांचे निधन झाले होते. त्यांच्या पश्चात श्री सदस्य परिवारातील सेवेकरी असलेले पुत्र भगवान भोसले, सून, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

### सुनील गायकवाड

**कर्जत** : नेरळनजीकच्या आसल गावातील सुनील



यशवंत गायकवाड यांचे ५५व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. भारतीय बौद्धसभा या संघटनेत ते धर्म प्रसारकाचे कार्य अनेक वर्षे करीत होते. डी. एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांना नेरळ विद्यामंदिर शाळेत गेली ३५ वर्षे शिक्षक म्हणून सेवा देत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.











पनवेल : प्रशांत पाटील यांच्या घरातील विराजमान गौरा गणपतीचे कामगार नेते सुधीर घरत यांनी सपत्नीक दर्शन घेतले.





उलवे नोड : येथील सेक्टर ८मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने विराजमान गौरा गणपतीचे माजी पं. स. सदस्य रत्नप्रभा घरत, अरुण घरत व तन्मई अंकित घरत यांनी दर्शन घेतले. या वेळी त्यांचे मंडळाच्या वतीने गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत यांनी स्वागत केले.










पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष अनिल भगत यांनी विविध ठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक.








पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रायगड विभागीय कार्यालय व संस्थेच्या शाखांच्या वतीने कृष्णाळे तलावाजवळील कर्मवीरांच्या पुतळ्यास मानवंदना देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी कर्मवीरांना अभिवादन केले.



पनवेल : तालुक्यातील शिरढोण येथील डायमंड मित्र मंडळाच्या गौरा गणपतीचे आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## संपादकीय

# कामाचा अतिताण घातक

पुण्यात कामाच्या अतिताणामुळे एका सनदी लेखाकार (सीए) तरुणीचा मृत्यू झाल्याचा दावा तिच्या आई-वडिलांनी केला आहे. या प्रकरणी पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. दरम्यान, चेन्नईत एका तरुणाने कामाच्या अतिताणाने आत्महत्या केल्याचे वृत्त समोर आलेय. कामाचा वाढता ताण जीवघेणा ठरतोय!

**अर्न्स्ट अ‍ॅण्ड यंग (ईवाय) या बहुराष्ट्रीय कंपनीच्या पुणे येथील कार्यालयात अ‍ॅना सेबास्टियन पेरायिल या २६ वर्षीय तरुणीचा कामाचा ताण असह्य झाल्याने बळी गेला आहे. तिच्या आईने याबाबत कंपनीच्या अध्यक्षांना पाठवलेला ई-मेल व्हायरल झाला. त्यात अ‍ॅनाचा कामाच्या अतिताणामुळे मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आलाय. त्याचबरोबर अ‍ॅनाच्या अंत्यसंस्काराला कंपनीतील एकही व्यक्ती उपस्थित राहिली नसल्याकडेही लक्ष वेधण्यात आले, तर अ‍ॅनाच्या वडिलांनी कंपनीतील मॅनेजर क्रिकेटच्या सामन्यानुसार कामाच्या वेळेत बदल करायचे. त्यामुळे माझ्या मुलीला काम पूर्ण करण्यासाठी तासन्‌तास बसून जास्त काम करावे लागायचे, असा आरोप केला आहे. या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणाची केंद्र सरकारने गंभीर दखल घेत चौकशी करण्याचे जाहीर केले आहे. केंद्रीय कामगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी कामाच्या ठिकाणी असुरक्षित आणि त्रासदायक वातावरणाचा आरोपांबाबत सखोल चौकशी करून अ‍ॅना व तिच्या कुटुंबियांना न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही दिली आहे. दुसरीकडे टीकेची झोड उठलेल्या ईवाय कंपनीने अ‍ॅनाच्या कुटुंबियांना आम्ही सर्वतोपरी सहकार्य करीत आहोत. त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे आम्ही अतिशय गंभीरपणे घेतले आहेत. कामगार हिताला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे म्हटले आहे. अशातच चेन्नईत एका तरुणाने कामाच्या अतिताणाने आत्महत्या केलीय. मूळचा तामिळनाडूतील कार्तिकेयन त्याच्या पत्नी आणि दोन मुलांसह चेन्नईत राहत होता. तो गेल्या १५ वर्षांपासून ते एका सॉफ्टवेअर कंपनीत तंत्रज्ञ म्हणून काम करत होता. कामाच्या अतिताणामुळे नैराश्येत गेल्याने त्याच्यावर उपचारही सुरू होते. त्याच्या आत्महत्येप्रकरणी अनैसर्गिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे. आजच्या धावत्या आणि स्पर्धेच्या जमान्यात कामाच्या ताणामुळे बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या आरोग्याला नुकसान पोहचत आहे. दिलेल्या मुदतीमध्ये काम पूर्ण करण्यासाठी आणि लक्ष्य साध्य करताना अतिताणाचा सामना करावा लागतो. अशा वेळी शारीरिक आणि मानसिक स्थास्थ्यावरही परिणाम होतो. दीर्घकाळ अशा पद्धतीने काम करण्याने डोकेदुखी, पचन समस्या, झोपेचे विकार होतात. त्याचबरोबर मानसिकदृष्ट्या चिंता वाढते, चिडचिड होते, रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. परिणामी शरीर कमकुवत होऊन आजारी पडण्याची शक्यता बळावते. अकाली वृद्धत्वदेखील वाढवते. सततच्या ताणामुळे उच्च रक्तदाब आणि हृदय गती वाढल्याने हृदयविकाराने मृत्यू ओढावू शकतो तसेच मानसिक आरोग्य समस्येतून नैराश्य, आत्महत्येची स्थिती उद्‌भवू शकते. आजच्या वेगवान जगात कामाचा झपाटा वाढलाय, परंतु कर्मचारी तंदुरुस्त असेल तरच तो जास्तीत जास्त उत्पादकता देऊ शकतो हे कंपन्यांनी ध्यानात घेतले पाहिले. कामगाराला जपले तर आपोआपच कंपनीची भरभराट होईल. दुसरीकडे कर्मचाऱ्यांनीही काम करताना मध्ये मध्ये छोटे ब्रेक घेणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे घरी असताना काही वेळ मोबाईल दूर ठेवून व्यायाम, वाचन केले पाहिजे. शक्य असल्यास आपली आवड, छंदही जोपासणे आवश्यक आहे. इंग्रजीत एक म्हण आहे हेल्थ इज वेल्थ अर्थात चांगले आरोग्य हीच खरी संपत्ती. तिच जपणे महत्त्वाचे आहे.**

# कर्जत तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावताहेत अडचणी





**खबरबात**
**विजय मांडे**

आपला देश कृषीप्रधान देश आहे. त्यातच रायगड जिल्हा पूर्वी 'भाताचे कोठार' म्हणून ओळखले जायचे. कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी दुबार भात शेती केली जाते. विशेष म्हणजे राजानाला विभागातील भात शेतीमध्ये विविध प्रयोग केले जातात, मात्र दहा-बारा वर्षांपूर्वी राजनाल्यातील कालव्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती केली. त्यानंतर सारे काही विस्कळीत झाले आणि दोन-तीन वर्षे कालव्यात पाणीच आले नाही तसेच भात बियाणांची टंचाई, हमी भाव भात खरेदी केंद्रामधील अडचणी त्यातच लहरी हवामान या सर्व गोष्टींमुळे कर्जत तालुक्यातील शेतकरी कंटाळला असून भात शेती करायची की नाही? या निर्णयापर्यंत शेतकरी बांधव आले आहेत.

यंदा पाऊस चांगला पडत असल्याने भात पीक चांगले आले आहे, मात्र पाऊस लांबला तर मात्र हे पीक पाण्यात जाईल, अशी भीती शेतकऱ्यांना भेडसावते. या बिन भरवशाच्या परिस्थितीमुळे नवीन पिढीचा कल शेती करण्यापेक्षा ती विकून त्या पैशाच्या जीवावर मजा करण्याकडे आहे.

माजी खासदार भाऊसाहेब राऊत, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब आरेकर, माजी सभापती रामचंद्र शितोळे आदींनी पाठपुरावा केल्यामुळे राजनाला प्रकल्प अस्तित्वात आला. राजनाला डाव्या कालव्याचे सिंचन १९५९-६०पासून सुरू आहे. तर राजनला उजवा कालवा व पाली पोटल कालव्याचे काम १९७२-७३ला पूर्ण झाले तर १९७४मध्ये यामधूनही सिंचनास सुरवात झाली. राजनाला डाव्या कालव्याची लांबी २१ किलोमीटर आहे. यामध्ये ३५ गावे समाविष्ट असून सिंचन क्षेत्र १८०० हेक्टर तर राजनाला उजवा कालव्याची लांबी ७.७० किलो मीटर असून ४ गावे सामाविष्ट असून सिंचन क्षेत्र ४०० हेक्टर आहे. पाली पोटल ९.८० किलोमीटर असून सहा गावांचा समावेश आहे. तर सिंचन क्षेत्र ३४२ हेक्टर इतके आहे. राजनाला भागात भात पीक इतके भरघोस येत असे की, लक्ष्मीकांत तथा बाळ दळवी, माजी सभापती तानाजी चव्हाण, गोपीनाथ चव्हाण, यशवंत गायकवाड, चंद्रकांत कडू आदींनी राजनाला बीजोत्पादन सहकारी संस्था स्थापन करून चांगल्या प्रतीचे भात बियाणे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्याला माजी आमदार सुरेश लाड यांनीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. त्यांनतर त्यामध्ये दुबार भात पीक घेणारे अनेक शेतकरी सहभागी झाले. सध्या तानाजी चव्हाण या संस्थेचे अध्यक्ष आहेत. ही संस्था अद्यापही सक्रिय आहे, मात्र गेल्या काही वर्षांपासून बीजोत्पादन करण्यात येत नाही.

फार पूर्वी बांधण्यात आलेला राजनाल्याचे बांधकाम मातीत होते, मात्र तरीसुद्धा शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहचून सर्व क्षेत्र ओलिताखाली येत होते, मात्र दहा - बारा वर्षांपूर्वी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे यांनी सुमारे सात कोटी निधी उपलब्ध करून दिला होता. हा निधी खर्च करून या राज नाल्याचे बांधकाम सिमेंट क्राँक्रिट मध्ये करण्यात आले होते, मात्र काम तंत्रशुद्ध पद्धतीने केले नसल्याने काही भागात मुख्य नाला खाली तर त्याला जोडणारे उपनाले तथा कालवे वर बांधले गेले परिणामी पाणी कसे वाहणार? तसेच नाल्याची दुरुस्ती, साफसफाई वेळेवर केली जात नसल्यानेही पाणी वाहण्यास अडथळा होतो.

कर्जत तालुक्यातील दुबार भात शेतीसाठी राजनाला हा वरदान ठरत आहे, मात्र मागील काही वर्षांपासून नाल्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याने पाणी वाहण्यास अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे राजनाल्याला पाणी सोडायचे असल्यास प्रथम राजनाल्याची डागडुजी करणे अतिशय गरजेचे आहे. तालुक्यातील दुबार भातशेतीसाठी राजनाला कालव्यातून दरवर्षी प्रमाणे १५ डिसेंबरला पाणी सोडण्यात येते आणि १५ एप्रिलला बंद करण्यात येते. कधी कधी पाणी सोडण्यासाठी जानेवारी महिनासुध्दा उजाडतो, मात्र मुख्य राजनाला कालव्याची पडझड झाल्याने आणि कालव्याच्या उपकालव्यांचे काम तंत्रशुद्ध पद्धतीने न झाल्याने हे पाणी सर्व गावापर्यंत पोहचत नाही. पावसाळ्यात सुद्धा राजनाल्याची योग्य डागडुजी न केल्याने पावसाळ्यात डोंगर कपारीतून येणारे पाणी राजनाल्याच्या खालून जाणाऱ्या मार्गाची सफाई न केल्याने ते पाणी त्या मार्गाने न जाता ते वरून जाते. त्यामुळे भातपीक वाहून जाण्याच्या घटना घडत असून शेतकऱ्यांचे खूप नुकसान होते.

दुरुस्तीच्या वेळी दोन वर्षे पाणी न सोडल्याने शेतकरी दुबार भात शेती पिकवू शकले नाहीत. त्या उलट काहींनी कडधान्य तर काहींनी भाजी पाल्यासारखी नगदी पिके घेण्यास सुरुवात केल्याने ही पिके भात पिकापेक्षा कमी मेहनतीची व कमी खर्चिक आणि कमी पाणी लागणारी असल्याने आजही ती पिके घेण्यासाठी शेतकरी वर्गाचा कल जास्त आहे, मात्र काही शेतकरी भात पीक न घेता जमिनी ओसाड ठेवतात. त्यामुळे पिकाचे नुकसान होतेच शिवाय जमिनीचेही न भरून येणारे नुकसान होते. कालांतराने त्या जमिनीची पूर्ण वाताहत होते. त्यातूनही पिकवलेले भात हमी भाव खरेदी केंद्रावर नेल्यावर तेथे रांगा लावाव्या लागतात. तर हमालीचे पैसे रोख द्यावे लागतात. तसेच दुबार भात शेतीसाठी चांगले बियाणे उपलब्ध नसल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे, कारण उशिरा बियाणे मिळाल्यास जून महिन्यातील पाऊस उभे पीक जमीनदोस्त करील. याची भीती आहे. खरेतर आशिया खंडातील एकमेव भात बियाणे पैदास करणारे कोकण कृषी विद्यापीठाचे प्रादेशिक कृषी केंद्र कर्जतमध्ये आहे तसेच तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती अस्तित्वात आहे. तरीही या तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे मिळत नाही, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. सर्वच समस्या सुटाव्यात.



## बदलते तंत्रज्ञान

# जुन्या चार्जरच्या तुलनेत सी टाईप चार्जर वेगळे

बारीक पिनचा चार्जर, साधा चार्जर, मोबाईल चार्जर एवढीच चार्जरची ओळख होती, मात्र नवे अँड्रॉइड फोन बाजारात आल्यापासून चार्जरलाही नवी ओळख मिळाली, ती म्हणजे टाईप सी चार्जर! पण टाईप सी च का? तर त्याची माहिती आणि वेगळेपण जाणून घेऊया.



यूएसबी चार्जरमध्ये A, B आणि C टाईप होते. पैकी A आणि B चार्जर जुन्या फोन साठी वापरून झाले. तेहा ते वापरणे फारच कॉमन होते, मात्र टाईप C चार्जर आल्यापासून मोबाईल ओळखणे आणि चार्जरचे वेगळेपण ओळखणे सोपे झाले.


C-टाईप चार्जर, ज्याला USB-C चार्जर असेही म्हणतात, हा एक प्रकारचा कनेक्टर आहे जो स्मार्टफोन, लॅपटॉप आणि टॅब्लेट यांसारखी इलेक्ट्रॉनिक उपकरणे चार्ज करण्यासाठी वापरला जातो. USB-C मधील C म्हणजे Type-C, जो कनेक्टरच्या आकाराचा संदर्भ देतो.

यूएसबी-सी हे चार्जिंग आणि डेटा ट्रान्सफरसाठी २०१४ मध्ये सी टाईप चार्जर बाजारात आणले. हे यूएसबी इम्प्लीमेंटर्स फोरम (USB-IF) द्वारे विकसित केले गेले आहे, ज्यामध्ये Apple, Google, HP, Intel, Microsoft आणि इतर USB-C चार्जर जुन्या USB-- आणि USB-B चार्जरच्या तुलनेत अधिक उपकरणांना जोडले जाते.

यूएसबी-सी चा एक महत्त्वाचा फायदा म्हणजे तो जुन्या चार्जरपेक्षा खूप जास्त पॉवर वितरीत करू शकतो. विविध प्रकारचे सी टाईप चार्जर लॅपटॉप तसेच इलेक्ट्रिक कार यांसारखी मोठी उपकरणे चार्ज करण्यासाठी याचा वापरली जातात. यूएसबी-सी जुन्या यूएसबी मानकांपेक्षा अधिक वेगाने डेटा वितरीत करण्यास सक्षम आहे, जे मोठ्या फाइल्स हस्तांतरित करण्यासाठी आणि हाय-डेफिनिशन व्हिडिओ स्ट्रीमिंगसाठी लाभदायक ठरते.

USB-C चा आणखी एक फायदा असा आहे की तो इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या निर्मात्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर स्वीकारला जात आहे. अनेक स्मार्टफोन, लॅपटॉप आणि टॅब्लेट आता यूएसबी-सी पोर्टसह येतात, याचा अर्थ असा की तुम्ही एकापेक्षा जास्त डिव्हाइसेसला पॉवर करण्यासाठी समान चार्जर वापरू शकता. जुन्या USB मानकांपेक्षा ही एक लक्षणीय सुधारणा आहे, ज्यासाठी भिन्न उपकरणांसाठी भिन्न चार्जर आवश्यक आहेत.

# स्वातंत्र्यसैनिक युसूफ मेहेर अली



**निमित्त**

युसूफ मेहर अली यांचे मूळ नाव युसूफ झफर मर्चंट हे भारतीय स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांचे कुटुंब मूळ गुजरातच्या कच्छ भागातील होते. मेहरअली यांच्या आजोबांचा मुंबईमध्ये कापडाचा व्यवसाय होता. मेहरअली फार कमी वयात भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले. तरुण वयात ते ब्रिटिश सरकारच्या गुलामगिरी विरोधात रस्त्यावर उतरले. कॉलेजमध्ये असताना ते बॉम्बे प्रेसीडेंसी युथ लिग संघटनेत सामील झाले. ते सोशालिस्ट पार्टीचे संस्थापक सदस्यापैकी एक होते. त्यांनी १९४२च्या चले जाव आंदोलनात महत्त्वाची भूमिका राबवली होती. 'चले जाव' ही घोषणादेखील त्यांनीच दिली होती. आज युसूफ मेहर अली यांचा जन्मदिन (२३ सप्टेंबर १९०३) आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

यूसुफ मेहर अली, भारतातील युवक चळवळीचे नेते, उत्तम वक्ते व स्वातंत्र्य चळवळीतील एक क्रांतिकारक. त्यांचे खोजा मुस्लिम कुटुंब मूळचे गुजरातच्या कच्छ संस्थानातील. त्यांचे वडील व्यापारानिमित्त मुंबई व कलकत्ता या शहरांत राहत. यूसुफ यांचा जन्म मुंबईत झाला, पण त्यांचे प्राथमिक शिक्षण कलकत्यात झाले. नंतर त्यांनी सर्व शिक्षण मुंबईतच घेतले. विद्यार्थि दशेतच रस्पूट्यीन क्लब नावाची युवक संघटना मिनू मसानी, उपेंद्र देसाई, के एफ. नरिमन आदी मित्रांच्या साह्याने त्यांनी स्थापन केली. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून (मुंबई विद्यापीठ) त्यांनी पदवी घेतली (१९२५). त्यानंतर ते एल्एल. बी झाले पण त्यांच्या युवक चळवळीमुळे त्यांना वकिलीची सनद नाकारण्यात आली. तेव्हा त्यांनी आ. रा. भटांच्या मदतीने बाँम्बे यूथलीगची स्थापना केली (१९२८). पुढे तिचेच रूपांतर बॉम्बे प्रसिडेन्सी यूथ लीगमध्ये झाले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तत्त्वांवर यूथ लीगची श्रद्धा होती. लीगच्या निवडक चारशे स्वयंसेवकांनी मेहरअलींच्या नेतृत्वाखाली मुंबई बंदरात सायमन कमिशनविरुद्ध निदर्शने केली. त्यात मेहरअलींना मार बसला. १९२९ मध्ये त्यांनी लष्कराच्या धर्तीवर नॅशनल मिलिशा नावाची सैनिकीसम संघटना स्थापन केली. या संघटनेचे ध्येय लोकांना शिक्षित करून स्वातंत्र्याची जाणीव करून द्यावयाची आणि नंतर त्यांना कृतीसाठी उद्युक्त करावयाचे, हे होते. या सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी चर्चासत्रे, बौद्धिके आयोजित केली आणि व्याख्याने दिली.

कलकत्त्याच्या अखिल भारतीय युवक काँग्रेसचे ते महासचिव झाले. बार्डोलीचा सारावंदी सत्याग्रह, मिठाचा सत्याग्रह आदींतून त्यांनी सक्रिय भाग घेतला. महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीनंतर त्यांनी स्वदेशी वस्तूंचा सर्वत्र प्रसार केला आणि मुंबईत स्वदेशी वस्तू विकल्या. भूमिगत राहून त्यांना जनजागृती करावयाची होती पण ते सापडले व त्यांना शिक्षा झाली. तुरुंगातील वातावरणात त्यांची प्रकृती अधिक क्षीण झाली. पुढे उपचारार्थ ते अमेरिकेला गेले (१९४७) पण फारसा उपयोग झाला नाही. अखेर ऐन उमेदीतच ते मुंबई येथे मरण पावले. २ जुलै, १९५० रोजी वयाच्या ४७व्या वर्षी त्यांचे निधन झाले. पनवेल येथील तारा येथे त्यांच्या नावे युसूफ मेहेर अली सेंटर चालवले जाते.

स्वातंत्र्य चळवळीत गुंतलेले असूनही, त्यांनी तरुणांसाठी विचारप्रवर्तक लेखन केले. वृत्तपत्रांतील स्फुटलेखनाशिवाय त्यांनी लीडर्स ऑफ इंडिया (दोन खंड-१९४२), ए ट्रिप टू पाकिस्तान (१९४३), द मॉडर्न वर्ल्ड (१९४५), द प्राइस ऑफ लिबर्टी (१९४८) इ. पुस्तके लिहिली. ते आजन्म अविवाहित राहिले. आणि सर्व जीवन त्यांनी देशासाठी वाहिले. ते नास्तिक होते. अनेक पारशी व हिंदू त्यांचे सच्चे मित्र होते. मुंबईच्या कामगार चळवळीतील व भारतीय युवक संघटनेतील त्यांचा वाटा संस्मरणीय आहे.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : दापोलीजवळील हर्णे मुरुड येथील कनकदुर्गावरील दीपगृह पर्यटकांना नेहमी आकर्षित करते.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# आयुर्वेदात लवंग खाण्याचे अनेक फायदे

आयुर्वेदात भारतीय मसाल्याने मोठं महत्त्व आहे. भारतीय मसाल्याने जगभरात मागणी आहे. अनेक मसाले तर औषध म्हणून वापरले जाते. आयुर्वेदात लवंग खाण्याचे अनेक फायदे सांगण्यात आले आहेत. खासकरून पुरुषांसाठी लवंग खाण्याचे मोठे फायदे होऊ शकतात. लैंगिक आरोग्यासाठी लवंगचा आहारात समावेश केला पाहिजे.



पचनशक्ती चांगली असेल तर माणूस निरोगी राहतो. पचनसंस्था ही अन्नाचे ऊर्जेत रूपांतर करते. त्यामळे शरीराला पोषण मिळते आणि आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, पण जर पचनसंस्था कमकुवत असेल तर तुम्हाला पोटाशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

यकृत खराब होण्याची समस्या वाढत आहेत. खास करुन पुरुषांमध्ये याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे स्वत:ला निरोगी ठेवण्यासाठी यकृत निरोगी ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. यकृत खराब झाले तर शरीराची कार्य करण्याची क्षमता कमी होत जाते. यकृताची योग्य काळजी घ्यायची असेल, तर भरपूर पाणी प्यायला हवे, सोबत आहाराकडे पूर्ण लक्ष दिले पाहिजे. लवंगमध्ये मोठ्या प्रमाणात अँटिऑक्सिडंट असतात, ज्यामुळे ते अवयवांचे, विशेषत: यकृताला मुक्त रॅडिकल्सच्या प्रभावापासून संरक्षित करते.

पुरुषांसाठी लवंग खूप फायदेशीर ठरू शकते. ज्यांचे लैंगिक आरोग्य व्यवस्थित नसेल तर लवंग खाण्याचा सल्ला दिला जातो. कामोत्तेजक किंवा लैंगिक उत्तेजना वाढवण्यासाठी लवंगचा वापर केला जातो.

मधुमेह टाळण्यासाठी खाण्याच्या सवयी सुधाराव्या लागतील. लवंग हे मधुमेहावर खूप चांगले औषध आहे. लवंगाचा उपयोग अनेक रोगांवर उपचार म्हणून केला जातो. मधुमेह होऊ नये म्हणून लवंगचा आहारात उपयोग करावा.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत असेल करण्यासाठी लवंगचे सेवन केले पाहिजे. कारण रोगप्रतिकारशक्ती मजबूत असेल तरच तुम्हाला आजारांपासून लांब राहता येते. विषाणू, बॅक्टेरिया इत्यादींच्या संसर्गापासून ते शरीराचे संरक्षण करते. आयुर्वेदात काही औषधी वनस्पतींचे वर्णन केले आहे जे रोगप्रतिकारक शक्ती विकसित करण्यास मदत करतात. अशीच एक औषधी वनस्पती म्हणजे लवंग.

**(ही माहिती सामान्य माहितीच्या आधारावर देण्यात आली आहे. कोणतीही समस्या असेल तर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.)**

# पुरस्कार आणखी कामासाठी बळ देतो -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगर आणि परिसरात काम करणारी अनेक व्यक्तिमत्वे, संस्था आहेत त्यांचा झालेला गौरव, त्यांना मिळालेला पुरस्कार हा त्यांना आणखी काम करण्यास बळ देतो, असे प्रतिपादन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी गणेश कोळी संपादित पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार सोहळ्यावेळी पनवेल येथे केले.

या पुरस्कार सोहळ्यास खगोल अभ्यासक, पंचांगकर्ते दा.कृ.सोमण, कामगार नेते, रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, ज्येष्ठ साहित्यिक रायगड भूषण प्रा. एल.बी. पाटील, सुप्रसिध्द अभिनेत्री मुग्धा गोडबोले, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, पनवेल टाइम्सचे संपादक गणेश कोळी उपस्थित होते. या समारंभात पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि सेवाव्रती संस्थांनापनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त पनवेल टाइम्सच्या विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या माझ्या स्वप्नातील पनवेल या निबंध स्पर्धेच्या विजेत्या स्पर्धकांनामान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

यापुढे बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, पनवेल हा वेगाने विकसित होणारा तालुका आहे आंतराष्ट्रीय विमानतळ, या भागात येणारे मोठंमोठे प्रकल्प यामुळे पनवेलचे चित्र प्रत्येक वर्षागणीत बदलत चाललेले आहे.

व्यक्ती आणि संस्थांना मिळालेल्या पुरस्कारांमुळेपनवेलचाअसाच गौरव वाढत राहो, समाजाने या पुरस्कार मिळालेल्या व्यक्ती आणि संस्थांचा आदर्श घ्यावा असे सांगून पनवेल टाइम्सने कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्वास आणि संस्थांना दिलेल्या पनवेल टाइम्स सन्मान पुरस्कार या उपक्रमाचे कौतुक केले.

# गव्हाण विद्यालयात कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेची पालखी मिरवणूक उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३७वी जयंती उत्सव संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत कनिष्ठ महाविद्यालयमध्ये अतिशय उत्साहात व जल्लोषात झाला.

या वेळी स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन अरुणशेठ भगत त्याचप्रमाणे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी त्याचप्रमाणे गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत तसेच सर्व सदस्यांनी अगदी आवर्जून येथे उपस्थिती दाखवली. चेअरमन अरुणशेठ भगत यांच्या हस्ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे व पालखीचे पूजन करण्यात आले.

उपप्राचार्य पी बी मंडले यांनी मार्गदर्शन केले. प्राध्यापक खेडकर, घरत सर, जे.ई. ठाकूर, ए आर पाटील तसेच उपशिक्षिका गोंधळी, वाय. एस. पाटील, एस.एस. ठाकूर, डी. आर. वर्तक, पी.एस. पाटील, एस.एस. म्हात्रे, यु.ए. म्हात्रे तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी आवर्जून उपस्थिती दाखवली. कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयाचे प्राचार्य जी.सी. गोडसे यांनी केले होते. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर. पाटील यांनी केले.

## निवडक

### घरफोडीत लाखोंचा ऐवज चोरला

**पनवेल :** एका बंद घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून लाखो रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे. खांदा वसाहतीमधील सेक्टर ११ येथे राहणारे भूषण बेर्डे हे घराबाहेर होते. याचवेळी अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास तीन लाख ५४ हजार रुपयाचा ऐवज चोरून नेल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### लैंगिक अत्याचारप्रकरणी गुन्हा

**पनवेल :** अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने घरात ओढून नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकाच्या विरोधात कारवाई करण्यात आली आहे. पीडित अल्पवयीन मुलगी ही घराबाहेर तिच्या वयाच्या मैत्रिणीबरोबर खेळत होती. त्या वेळी आरोपीने तिला बोलावले, मात्र ती न आल्याने आरोपीने जबरदस्तीने स्वत:च्या घरात तिला ओढत नेण्याचा प्रयत्न केला, मात्र पीडितेने आरडाओरडा केल्याने पीडितेचे नातेवाईक धावून आले व तिची सोडवणूक केली. जबरदस्तीने घरात घेऊन जात असताना आरोपीने तिच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यामुळे या प्रकरणी बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

### पनवेलमध्ये रक्तदान, आरोग्य शिबिर

**पनवेल :** श्री प्रल्हाद रे झुलेलाल ट्रस्ट, श्री पूज्य सिंधी पंचायत ट्रस्ट पनवेल नवी मुंबई प्रिंट आणि डिजिटल



पत्रकार संघटना आणि आम्ही रक्तदाते पनवेलचे यांच्यातर्फे रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन आज करण्यात आले होते. श्री पूज्य सिंधी पंचायत झुलेलाल मंदिर विश्राळी नाका पनवेल येथे रविवारी (दि २२) सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत हे शिबिर आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला आयोजक अ‍ॅड. मनोहर सचदेव, अमोल साखरे यांच्यासह संजय कदम व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यानिमित्ताने आरोग्य तपासणीसह सेल्फी पॉईंट उभारण्यात आली होती.

# नवनाथ नगर वसाहतीमध्ये गौरा गणपती उत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एकनिष्ठ मित्र मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चाळ नवनाथ नगर वसाहत रेल्वे स्टेशन रोड पनवेल येथे सार्वजनिक गौरा गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला.

या वेळी भाजप पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस जयंत पगडे, माजी नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, तेजस कांडपिळे, युवा नेते प्रतिक बहिरा, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, प्रभाग क्रमांक २० चे शक्ती केंद्र प्रमुख राजू बगाटे यांचा एकनिष्ठ मित्र मंडळाकडून शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी एकनिष्ठ मित्र मंडळ अध्यक्ष मनोज झिरे आणि कार्यकर्ते राजू झिरे, गोपाल पट्ठे, बाळा जाधव, राहुल बावस्कर, विजय झिरे, सागर शेलार, रोशन पवार, रितेश बावस्कर, सुमित जाधव, सय्यद झाकिर शेख हनुमंता तल्लोली, मानव सातवे, वैभव सातवे, करण जगताप, प्रनेश नाईक करण जाधव, राजू बोदडे, हेमंत सकपाळ, तौसिफ शेख, विकास पवार, अमिर शेख,रोहन पवार, कृष्णा सुरळकर, सनी साळवे, निखिल रेड्डी, बाळा गव्हाणे, राजू बागडे, दिनेश झिरे, पृथ्वी झिरे, कांतीलाल पट्ठे, सय्यद शेख, अकिफ शेख, रंजित आदी भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजप जेएनपीटी टाऊनशिप अध्यक्षपदी डी.पी. सोनावणे



**उरण : बातमीदार**

जेएनपीटी बहुउदेशिय सभागृह, टाऊनशिप, उरण येथे भाजप उरण आयोजित प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा व भव्य पक्ष प्रवेश सोहळा आणि रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. त्या वेळी सामाजिक कार्यकर्ते डी.पी. सोनावणे यांची जेएनपीटी टाउनशिप येथील भाजप अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, नंदू पटवर्धन, कामगार नेते सुरेश पाटील, वाहतूक संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सुधीर घरत, चंद्रकांत घरत, जितेंद्र घरत, महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, नगराध्यक्ष सायली म्हात्रे आदी पदाधिकारी मान्यवर उपस्तिथ होते.

डी. पी. सोनावणे यांच्या या निवडीचे सर्वच स्तरातून स्वागत करण्यात येत असून विविध प्रतिष्टीत मान्यवरांनी भेटून तर अनेक चाहत्यांनी, नागरिकांनी त्यांना व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुक आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



**पनवेल : गौरा गणपतीनिमित्त श्री नवनाथ मित्र मंडळ, परदेशी आळी यांच्यातर्फे मेट्रो पॉलिस लॅब आणि श्री क्लीनिक यांच्या माध्यमातून मोफत थायरॉईड तपासणी, कोलेस्ट्रॉल तपासणी तसेच मोफत आरोग्य तपासणी शिबिर भरविण्यात आले होते. या वेळी रहिवाशांनी शिबिराचा लाभ घेतला.**



**पनवेल : तालुक्यातील वडवली येथील विश्वास पाटील यांच्या गणरायाचे भाजप पळस्पे विभागीय सरचिटणीस रवींद्र शेळके यांनी दर्शन घेतले. सोबत राम म्हात्रे व अविनाश भोईर.**

# उलवे येथे कर्मवीर जयंतीनिमित्त पालखी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे शिल्पकार पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७व्या जयंतीनिमित्ताने सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल मराठी माध्यम व सीबीएससी माध्यमाच्या वतीने उलवे नोड येथील सेक्टर २४ मध्ये पालखीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे कमिटी मेंबर व भारतीय जनता पक्ष उलवे नोड १चे अध्यक्ष निलेश खारकर व मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर उपस्थित होते. प्रतिमा व पालखी पूजन नंतर श्रीफळ वाढवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

लेझीम नृत्यांच्या गजरात शाळेचे सर्व विद्यार्थी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत जयंतीचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणात झाला.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात परिसंवाद

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान व संगणक विभागातर्फे शुक्रवारी (दि.२०) औद्योगिक वेब व अ‍ॅप इकोसिस्टमवर परिसंवादाचे आयोजन केले होते.

या परिसंवादासाठी प्रमुख वक्त्या म्हणून ऐश्वर्या मोहिते म्हणून यांनी उपस्थित राहुन महाविद्यालयातील सर्व माहिती तंत्रज्ञान व संगणक विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या परिसंस्थाचा प्रमुख उद्देश दोन्ही विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनींना वेगवेगळे पबद्दल तसेच इंडस्ट्रियल वेबबद्दल माहिती व्हावी हा होता. प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी महाविद्यालयातील दोन्ही विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी परिसंवादामध्ये सहभागी झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

या परिसंवादाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. राजश्री म्हात्रे यांनी केले व दोन्ही विभागातील इतर सर्व प्राध्यापकांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : भाजप तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी यांच्या गौरा गणपतीचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दर्शन घेतले. या वेळी माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा कार्यकर्ते शुभ पाटील आदी उपस्थित होते. त्यांचे स्वागत व सन्मान करण्यात आला.**


महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ३७/२०२४-२०२५ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा व सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेच्या जलशुद्धीकरण केंद्रातील व विविध ठिकाणी असलेल्या एलटी पॅनेलची वार्षिक तत्वावर साहित्यासह देखभाल दुरूस्ती करणे. | ₹ १३,१६,०४३.०० |
| २ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती ... रोहा येथील शुद्ध व अशुद्ध जलउदंचन केंद्र व जलशुद्धिकरण केंद्राचे एक वर्ष कालावधीसाठी परिचालन व देखभाल दुरूस्तीकरीता सेवा पुरविणे. | ₹ ३७,८६,१४४.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील सांडपाणी उदंचन केंद्राचे एक वर्ष कालावधीसाठी परिचालन व देखभाल दुरूस्तीकरीता सेवा पुरविणे. | ₹ २९,८९,१७६.०० |
| ४ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... महाड औद्योगिक क्षेत्राच्या परिसरातील प्रदूषण ग्रस्त गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या जलवितरण वाहिनीची वार्षिक तत्वाव देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३०,६९,३०९.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील उर्ध्व, गुरूत्व व जलवितरण वाहिन्यांची सन २०२४-२५ करीता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ ३२,२१,७२१.०० |
| ६ | तळोजा औद्योगिक क्षेत्र... नावडे येथे गेट १२ A येथे बांधण्यात आलेला रेल्वे ओव्हर ब्रिज .... पीआर -८ - पीआर -९- एस-६, एस ८ आणि पीआर -११ - पीआर -१२ - एस ६ च्या डेक स्लॅबची आपत्कालीन संरचनात्मक दुरुस्ती करणे. | ₹ ३७,१७,७४६.०० |
| ७ | पेन अलिबाग विभाग पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...पोयनाड येथील उपविभाग कार्यालयाच्या अंतर्गत भागाची दुरुस्ती करणे. | ₹ ३९,८६,७४१.०० |
| ८ | अलिबाग विभाग...अलिबाग विभागीय कार्यालयातील जुने वाहन क्रमांक एमएच -०६-बीएम-५४०१ (मारुती स्विफ्ट डिझायर एलएक्सआय) चा लिलाव "जसे आहे तिथे आहे" या तत्वावर करणे. (दुसरी मागणी) | ₹ ३,२६,०२२.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २३/०९/२०२४ ते दिनांक ३०/०९/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २५/०९/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/०९/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.




















पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष अनिल भगत यांनी विविध ठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक.







पनवेल : भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विविध ठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक.

# पाली-खोपोली मार्गावर मोकाट गुरांचा ठिय्या

## अपघाताची भीती; वाहनचालक हैराण

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

पाली-खोपोली मार्गावर रासळ येथे सद्य परिस्थितीत मोठ्या प्रमाणात मोकाट गुरे ठिय्या ठोकत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यामुळे वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून अपघाताची शक्यता व्यक्त होत आहे.



पाली-खोपोली महामार्गाचे काम झाल्याने या मार्गावरून वाहनांची वर्दळ वाढली आहे. असे असले तरी या मार्गावर वाढत्या मोकाट गुरांच्या संख्येमुळे चालकांना वाहन चालवताना अक्षरश: तारेवरची कसरत करावी लागत आहे.

या मोकाट गुरांच्या दिवसेंदिवस वाढत्या संख्येमुळे या गुरांना कोणी वाली आहे की नाही? असा प्रश्न निर्माण झाले आहेत. या मोकाट गुरांचे कळप रस्त्याच्या मधोमधच ठाण मांडून बसलेले असतात. यांच्यामागे कोणीच गुराखी वैगरे दिसत नाही, तसेच वाहनचालकांना जाण्यासाठी रस्ताच मोकळा नसल्यामुळे गाडीचा हॉर्न वाजवूनसुद्धा गुरे बाजूला होत नाहीत. शेवटी वाहनचालकांना गाडी बाजूला उभी करून गुरांना बाजूला करावे लागत आहेत. या मोकाट गुरांच्या रस्त्याच्या मधोमध बरेच वेळा झुंज होत असतात. या झुंजीमुळे गाड्यांना अपघात होऊन गाड्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहेत.

जर का यामध्ये वाहनचालकांची चूक नसताना एखाद्या गुराला जर धडक बसून अपघात झाला तर लगेचच गुरांचे मालक त्या ठिकाणी नुकसान भरपाईचा दावा करण्यासाठी पुढे सरसावत असतात.

त्यामुळे पाली-खोपोली महामार्गावर मोकाट गुरांचा लवकरात लवकर बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनचालकांतून होत आहे.

## निवडक

### मुरूडमध्ये कायदेविषयक शिबिर




**मुरूड** : तालुका विधी सेवा समिती व एकात्मिक बालविकास सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिक्षण शिबिर पंचायत समिती येथे घेण्यात आले. या शिबिरांमधून महिलांना कौटुंबिक हिंसाचार याबाबतचे कायदे, कलम समजावण्यात आले. महिलांचे विविध हक्क व अधिकार, वारसा हक्काने मिळणाऱ्या जमिनीवर मुलींचा अधिकार याबाबत माहिती देण्यात आली. कार्यक्रमासाठी तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष तथा दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश जी. आर. तिवारी, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, ॲड. दत्ता पाटील, ॲड. अजित चोगले, ॲड. मोहन तांबडकर, ॲड. मनाली सतविडकर, बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल, सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस उपस्थित होत्या.

### तळाशेत जि.प.अध्यक्षपदी शैलेश भोनकर



**माणगाव** : राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुक्यातील तळाशेत (इंदापूर) जिल्हा परिषद गट अध्यक्षपदी पं.स. माजी सदस्य शैलेश भोनकर यांची नियुक्ती खासदार सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. तशा आशयाचे नियुक्तीपत्र तालुकाध्यक्ष काका नवगणे यांनी इंदापूर येथील पक्षाच्या कार्यक्रमात खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते शैलेश भोनकर यांना देण्यात आले. आपल्या वडिलांचा सामाजिक, सहकार, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील योगदानाचा आदर्श नजरेसमोर ठेऊन शैलेश भोनकर हे विविध क्षेत्रात काम करीत आहेत. शैलेश भोनकर हे मागच्या वेळेस माणगाव पंचायत समितीच्या निवडणुकीत साई पंचायत समिती गणातून भरघोस मतांनी निवडून आले होते. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

## माथेरान घाटात नवीन मिनीबस धावणार

**माथेरान, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-माथेरान मिनीबस सेवा डबघाईला आली असून जुन्या मिनीबस जीर्ण झाल्या आहेत. याकरिता येथील माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी राज्य परिवहन महामंडळांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेत नवीन मिनीबस मागणीसंदर्भात निवेदन दिले. आता लवकरच माथेरान घाटरस्त्यावर नवीन मिनीबस धावणार असल्याची आशा पल्लवित झाली आहे.

स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनी मागील वर्षी पालकमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन कर्जत-माथेरान या घाटरस्त्यासाठी दोन नवीन मिनीबस खरेदीकरीता निधी मंजूर करून घेतला होता. घाटरस्त्यावर मिनीबस चाचणीसुद्धा केली होती, मात्र चाचणी घेतलेली अशोका कंपनीच्या मिनीबसची लांबी थोडी जास्त असल्याने मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे निधी असाच पडून आहे. याच अनुषंगाने येथील माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी एसटी महामंडळाच्या डेप्युटी जनरल मॅनेजर यामिनी जोशी यांची रामवाडी पेण भेट घेऊन निवेदन दिले.

यावर अधिकारी वर्गाने सकारात्मक प्रतिसाद देत सोमवारी (दि.२३) होणाऱ्या नियोजन मंडळाच्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे सांगितले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे, कोकणवासीय समाज अध्यक्ष चंद्रकांत सुतार आणि स्थानिक उपस्थित होते.



## पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी संकेत कांबळे ताब्यात

**कर्जत : प्रतिनिधी**

गेली पाच-सहा वर्षे पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी अखेर नेरळ पोलिसांच्या जाळ्यात अडकला.

संकेत कांबळे याने अनेकांची आर्थिक फसवणूक केली आहे. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांचादेखील समावेश आहे. आपली मंत्रालयात ओळख असून कांबळे यांनी शासन स्थरावरील कामे करून घेण्यासाठी सर्वसामान्य आणि पोलीस अधिकाऱ्याकडून पैसे उकळले होते. पैसे घेऊनही कामे पूर्ण न करता कांबळे याने कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. नेरळ शहर आणि परिसरातील असे अनेकांकडून कांबळेने सुमारे एक कोटी रुपये गोळा केल्याचे समजते. कांबळे हे पैसे गोळा करून नेरळ शहर सोडून बेपत्ता झाला होता. नेरळ पोलीस ठाण्यात अनेकांनी तक्रार दाखल केली होती.



कांबळे हा गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ आपली ओळख लपवीत कुटूंबापासूनदेखील वेगळा राहत होता. सतत आपले राहते ठिकाण बदलत असल्याने त्याला पकडणे हे नेरळ पोलिसांसमोर एक आव्हान होते, मात्र नेरळ अधिकारी शिवाजी ढवळे आणि त्यांच्या टीमने दमदार कामगिरी करीत संकेत कांबळेच्या पनवेल येथून मुसक्या आवळल्या.

## मोरे महिला महाविद्यालयात महिला सुरक्षितता कार्यशाळा

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे महिला महाविद्यालयात महिला सुरक्षितता या विषयावर महिला विकास कक्षातर्फे शुक्रवारी (दि. २०) एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

रोहा पोलीस स्टेशनच्या महिला हेड कॉन्स्टेबल मंगल गणेश टेमकर, निलीशा जयेंद्र पेढवी आणि प्रशिला शैलेश साळुंखे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. आजच्या महिला अत्याचारांच्या वाढत्या घटनांमागील कारणे, गुन्हेगारी प्रवृत्ती, सायबर धोके, कायदेशीर प्रक्रिया यांची महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये जागरूकता करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. मुलींना आपत्कालीन परिस्थितीमध्ये अत्यावश्यक फोन नंबर दिले आणि त्यांच्या पोलीस सेवेतील अनुभव देखील सांगितले.

एम. बी. मोरे फाउंडेशनचे संचालक अशोक मोरे, प्राचार्य प्रा. प्रसन्न म्हसळकर, महिला विकास कक्षाच्या प्रा. ममता बिंद आणि विद्यार्थिनी या वेळी उपस्थित होत्या.



## टीएमसी कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती प्रदान कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज (टीएमसी) व श्रीमती स्वाती नीलकंठ सावंत ज्युनिअर कॉलेजमधील होतकरू ८३ विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि.२०) शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले.

शिष्यवृत्तीचे धनादेश नायब तहसीलदार घेमुड व संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक त्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. श्री शिवाजी मंदिर ट्रस्ट दादर व सरस्वती एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्या सहकार्याने ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्यात आली. त्यामुळे गरीब विध्यार्थ्यांच्या फीचा प्रश्न सुटल्याचे प्राचार्य हर्षल जोशी यांनी सांगितले. नायब तहसीलदार घेमुड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य हर्षल जोशी यांनी प्रास्ताविक करून शिष्यवृत्तीबद्दलची माहिती दिली.

कार्यक्रमास प्रा.नितीन मुटकुळे, प्रा.जगदीश शिगवण, प्रा.भारत पवार, प्रा.निकिता मांडवकर, प्रा.सारिका सायगावकर, दिलीप ढेपे, संजय गायकवाड, ग्रंथपाल अमित बाकाडे, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.





## वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सलग सुट्ट्या आल्याने मोठ्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात दाखल झाले आहेत. त्यामुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्यांची संख्या वाढली आहे. अशा वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शनिवारी (दि.२१) वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण २९१ चालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून तीन लाख पाच हजार ७०० रुपये इतका दंड आकारला आहे.

## श्री अष्टविनायक पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद -खासदार धैर्यशील पाटील

**नागोठणे : बातमीदार**

पतसंस्था काढणे सोपे आहे, परंतु ती टिकविणे फार कठीण आहे आणि हे अवघड काम श्री अष्टविनायक पतसंस्थेचे अध्यक्ष विलास चौलकर व त्यांचे संचालक मंडळ यशस्वीरित्या पार पाडत आहेत. पतसंस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार खासदार धैर्यशील पाटील यांनी काढले.

नागोठणे येथील श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि.२०) झाली. या वेळी खासदार धैर्यशील पाटील बोलत होते.



पतसंस्थेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, शासकीय ऑडिटर दिनेश कोळी, कायदेशीर सल्लागार ॲड. धनंजय धारप, कोकण मर्कंटाईल बँकेचे व्यवस्थापक अशोक हिरवे, राजिपचे निवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी शरद वाडेकर, राष्ट्रवादीचे नेते सदानंद गायकर, भाजप नेते किशोर म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, शहराध्यक्ष सचिन मोदी, राष्ट्रवादीच्या शहरध्यक्ष सुजाता जवके, उपाध्यक्ष प्रतिभा तेरडे, माजी सरपंच निलोफर पानसरे, ग्रामपंचायत सदस्या पूनम काळे, चंद्रकांत गायकवाड, एस. एन. गायकवाड, पतसंस्थेचे उपाध्यक्ष महादेवसिंग परदेशी, संस्थापक अध्यक्ष जयराम पवार, सचिव प्रफुल नागोठणेकर, खजिनदार रतन हेंडे, संचालक रोहिदास हातनोलकर, दिलीप धाडसे, रवींद्र वाजे, दिनेश घाग, श्वेता चौलकर, वृषाली जोगत, संध्या सांगले, राजेंद्र गायकर, व्यवस्थापिका शैला घासे आदींसह सभासद उपस्थित होते.

अध्यक्ष विलास चौलकर मार्गदर्शन करताना म्हणाले कि, सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने व कठोर परिश्रमाने आपली पतसंस्था यशस्वी वाटचाल करीत आहे, असे सांगितले. दरम्यान पतसंस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व विशेष कर्तृत्व केलेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला.

## रोह्यात रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपच्या वतीने शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी (दि. २०) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरात ७१ दात्यांनी उस्फूर्तपणे रक्तदान केले.

रोहा तालुका भाजपच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून अमित घाग यांच्या माध्यमातून मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे. या वेळी तालुकाध्यक्ष अमित घाग, रोहा शहराध्यक्ष यज्ञेश भांड, जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, महिला जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, तालुका उपाध्यक्ष रवींद्र तारु, जिल्हा युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे, ज्येष्ठ नेते वसंत शेलार, सचिन मोरे, विनायक बेडेकर, संजय लोटणकर, मारुती देवरे, वैभव शेलार, अनिल घरजाळे, सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



## उत्कर्ष मंदिरच्या विद्यार्थ्यांची संशोधन केंद्राला भेट

**कर्जत : प्रतिनिधी**

शिक्षण प्रसारक मंडळ मालाडच्या उत्कर्ष मंदिर शाळेतील इ. १०वीच्या २१६ विद्यार्थ्यांनी येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला भेट झाली. त्यानंतर विद्यार्थी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम झाला.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रकाश शिनगारे हे होते, तर प्रमुख पाहुणे उद्योजक विनायक काशिद होते. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे हे प्रमुख अतिथी म्हणून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. व्यासपीठावर सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, प्रगतशील शेतकरी व उद्योजक श्रीधर गांगल, उत्कर्ष मंदिरच्या मुख्याध्यापिका प्रतिभा अडूरकर, कृषिविद्यावेत्ता डॉ. विजय सागवेकर, मत्स्य शास्त्रज्ञ डॉ. शशिकांत मेश्राम, खारजमीन संशोधन केंद्राचे प्रभारी डॉ. प्रवीण वणवे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ.भावे म्हणाले की, शेतीसारखा फायदेशीर व्यवसाय अन्य कोणताही नाही. विद्यार्थ्यांनी कृषिक्षेत्रात आभाळभर संधी उपलब्ध असल्याने स्वतःचा व्यवसाय वा उद्योग उभारण्याची मनिषा ठेवून कृषिपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योगाद्वारे रोजगार निर्माणकर्ते व्हायला हवे. महासंचालक भागडे यांनी, राज्यातील कृषी पदवी व पदविकांसाठी असलेल्या विविध अभ्यासक्रमांची, त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगाराच्या संधींची माहिती त्यांनी दिली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. शिनगारे यांनी कृषिक्षेत्रातील संशोधन कार्यामुळे विविध पीक उत्पादकतेत झालेल्या वाढीचा आढावा घेत अमेरिकन लाल मिलो आयातीवर अवलंबून असलेल्या आपल्या देशाची अन्नसुरक्षा बळकट झाली असून देश प्रमुख निर्यातदार तर झालाच आहे. शिवाय देशाकडे बफर मानकापेक्षा जास्त अन्नसाठा उपलब्ध आहे, असे नमूद केले.

प्रतिभा अडूरकर आणि शिक्षक प्रतिनिधी रंगनाथ गोड यांनी मनोगत व्यक्त केले. सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

## वडगाव शाळेत स्वच्छता शपथ, तज्ज्ञांचे व्याख्यान

**चौक : प्रतिनिधी**

स्वच्छता ही सेवा कार्यक्रमांतर्गत वडगाव शाळेत स्वच्छता शपथ व स्वच्छता गीतगायनासह तज्ज्ञांचे व्याख्यान झाले.

रायगड जिल्हा परिषदेकडून राबविला जात असलेल्या स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमांतर्गत उच्च प्राथमिक वडगाव शाळेकडून स्वच्छता रॅली, स्वच्छता प्रतिज्ञा, स्वच्छता गीत गायन,पथनाट्य, मानवी साखळी याद्वारे जनजागृती करण्यात आली. या वेळी आरोग्य मार्गदर्शक कविता मोहन दहिफळे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, सर्व शिक्षक, स्वयंसेविका यांसह गावस्वच्छता मोहीम राबविली. यासाठी मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या अध्यक्षतेखाली वैजनाथ जाधव उपक्रमाचे प्रमुख व मयुरी धायगुडे उपक्रम सहायक यांनी नियोजन करून घोषवाक्ये, गीत, नाट्य आदींचे आयोजन केले.

गावात रॅली काढून लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले.

























पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शहराध्यक्ष अनिल भगत यांनी विविध ठिकाणच्या गौरा गणपतींचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भाविक.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com